MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक – दिपक थोरात

## गोदापात्रात अवैध वाळू उपसा जोरात

### महसुल, पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष

गेवराई (प्रतिनिधी)

तालुक्यातील राक्षसभुवन, सावरगांव,गंगावाडी, म्हाळसपिंपळगावं, राजापुर, सावळेश्वर, पांढरी सह विविध भागातील गोदावरी नदी पात्रातुन वाळु माफिया हायवा, ट्रॅक्टर, केनी द्वारे बेसुमार वाळु उपसा करत असल्याने मोठ्या प्रमाणात महसूल बुडत आहे. तसेच गोदावरी नदी पात्रात खड्डेच खड्डे झाले आहेत. मात्र याकडे महसूल व पोलीस प्रशासन दुर्लक्ष होत आहे.

तालुक्यातील राक्षसभुवन, सावळेश्वर, म्हाळसपिंपळगावं, राजापुर, पांढरी, गुंतेगावं, सुरळेगावं सह विविध गावातुन गोदावर नदी पात्र गेल्याने याच नदीकाठा वरिल भागात गेल्या अनेक वर्षांपासुन वाळु माफिया मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा करत असुन त्यामुळे महसूल बुडत आहे. या अवैध वाळु उपसा विरोधात महसुल व पोलीस प्रशासन नावापुरती थोडी फार कारवाई करते. मात्र येरवी हायवा, ट्रॅक्टर, केनी द्वारे खुले आम अवैध वाळु उपसा करून वाहुन खुले आम केली जात असुन यामुळे वाळु माफियाची चांदी होतांना दिसत

आहे. तर याकडे महसुल व पोलीस प्रशासन दुर्लक्ष होत आहे. या अवैध व बेसुमार वाळु उपसा मुळे गोदावरी नदीत पात्रात मोठ्या प्रमाणात खड्डेच, खड्डे पडल्याने गोदावरीचे पात्र धोक्यात आले आहे. त्यामुळे पर्यावरणाचाही हास होत चालला आहे. तरी प्रशासनाने अवैध वाळु उपसा बंद करावा अशी मागणी सर्व सामान्य नागरिका मधुन होत आहे.वाळु माफियाचे लोकेशनवाले तहसीलदार याच्या घरा समोर, तहसील कार्यालया समोर तसेच राक्षसभुवन फाटा, म्हाळसपिंपळगावं फाटा , गुंतेगावं चौफुली तलवाडा ते राहीरी भोगलगाव रोड चौकात सह विविध ठिकाणी लोकेशन वाले दिवसभर बसलेले असतात.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२२१ | शुक्रवार दि.०३ मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -221 | FRIDAY DT. 03 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# संभाजीनगरमध्ये भीषण अपघात, अजिंठा घाटात ६६ प्रवासी घेऊन जाणारी बस उलटली



**छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमधून एक मोठी बातमी समोर येत आहेत. येथील अजिंठा घाटात ६६ प्रवासी घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला आहे. घाटात बस उलटल्याने हा भीषण अपघात झाला आहे.**

**छत्रपती संभाजीनगरमधून एक मोठी बातमी समोर येत आहेत. येथील अजिंठा घाटात ६६ प्रवासी घेऊन जाणाऱ्या बसचा भीषण अपघात झाला आहे.**

**घाटात बस उलटल्याने हा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये सात ते आठ प्रवासी जखमी झाले असल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. जखमींना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.**




मिळालेल्या माहितीनुसार, अजिंठा घाटात रावेर आगाराच्या पुणे रावेर बसचा अचानक ब्रेक निकामी झाल्यामुळे हा मोठा अपघात घडला. अजिंठा घाटात उतरत असताना अचानक समोरून ट्रक आला असून ब्रेक अचानक नीकामी झाल्यामुळे ही बस पलटी झाल्यामुळे यात सात ते आठ प्रवासी हे जखमी झाले आहेत. सुदैवाने यात कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नसून प्रवासी यात किरकोळ जखमी झाले आहेत.

# पंकजाताई मुंडे यांच्या जोशपूर्ण भाषणाने उत्साह संचारला ; चिंचाळा, आसरडोह, विडयात जंगी सभा

### विकासाचं ताट वाढून ठेवलय ते उधळू नका ; तुमच्या लेकीला आशीर्वादाचं बळ द्या – पंकजाताई मुंडे

### महामार्ग झाले, रेल्वेही आली ; आपल्याला आता विकासापासून कोणीही रोखू शकणार नाही बीड जिल्हयाला दुष्काळमुक्तीकडे न्यायचयं

**वडवणी–धारूर । जिल्ह्यातील जनतेची सेवा करताना मी पाच वर्ष मंत्री म्हणून काम केले. पराभवानंतरही जनतेची सेवा केली. जिल्हयात उद्योग आणायचे असतील तर अगोदर पायाभूत सोयी केल्या. रेल्वे आली, महामार्ग झाले आता उद्योगही आणता येतील. मला जिल्हा दुष्काळमुक्त करायचायं त्यासाठी आशीर्वादाचं बळ द्या असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी केलं आहे.**

पंकजाताई मुंडे यांच्या आज चिंचाळा (वडवणी), आसरडोह (धारूर) विडा (केज) येथे जंगी सभा झाल्या, याठिकाणी त्यांच्या जोशपूर्ण भाषणाने मतदारांमध्ये उत्साह संचारला होता. पंकजाताई म्हणाल्या, आम्ही माणूस बघतो, जातीपातीला आमच्याकडे स्थान नाहीच. विकास हेच आमचे तत्व आहे. देशाचे कणखर नेतृत्व असलेले नरेंद्र मोदी हेच पुन्हा एकदा पंतप्रधान होणार आहेत. मोदींजींच्या रुपाने वर्षानुवर्षे देशासाठीचा नेता आपल्याला मिळाला आहे त्यामुळे त्यांच्या नेतृत्वात काम करण्यासाठी तुमच्या लेकीला या निवडणूकीत संधी देवून संसदेत पाठवा असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले.निवडणूका जवळ आल्या की, विरोधकांकडून जातीवादाचा मुद्दा पुढे केला जातो, मराठा–मुस्लिम बांधवांनी विरोधकांच्या भूलथापांवर विश्वास ठेवू नये, पाच वर्ष मला बीड जिल्ह्याची सेवा करण्याची संधी द्या, तुमच्या विश्वासाला पात्र ठरेल असे आवाहनही त्यांनी केले.

तुमचं– माझं नात अतुट

माझ्या पित्याने जिल्ह्याच्या विकासासाठी आयुष्य खर्ची केलं. त्यांच आपल्याला सोडून जाण्याचे शल्य माझ्या मनात आहे. त्यांनी मला घडवले. संघर्ष शिकवला.त्यांच्याच विचारांनी मी वाटचाल करते आहे असे सांगत पंकजाताई म्हणाल्या, मी दिल्लीतून तुमची काळजी घेईल. माझं अन् तुमचं नातं कधीच तुटणार नाही. मुंडे साहेबांनी अनेकांना प्रेम दिलं,मोठं केलं पण तरीही ते मुंडे साहेबांना सोडून गेले. मात्र आम्ही कधीच त्यांच्याबद्दल काही बोललो नाही. आताही मला समोरच्या उमेदवाराबद्दल काहीच बोलायचे नाही. मी श्रीमंत मनाच्या पित्याची कन्या आहे. सर्वसामान्यांबद्दलची आत्मियता मला आहे. घडी गेली की, पिढी जाते, सर्व प्रश्न मार्गी लागतील पण ही संधी आपल्या सर्वांच्या जीवनात पुन्हा येणार नाही. बीड जिल्ह्यात रोजगार, उद्योग आणून तरुणांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करुन देईल. मराठा–मुस्लिम बांधवांनीही विरोधकांच्या भूलथापांवर विश्वास ठेवू नये. तुमची सुरक्षा ही आमची जबाबदारी आहे. सर्व जाती–धर्माचे लोक मुंडे साहेबांवर प्रेम करणारे होते. मात्र आता उगाचच विरोधक मुस्लिम आणि मराठा समाजातील लोकांची दिशाभूल करत आहेत. या अपप्रचाराला तुम्ही मतदारांनी बळी पडू नका. माझ्यावरची माया पातळ करु नका, शंभर टक्के मला मतदान करा. पालकमंत्री असताना जिल्ह्यातील शेतकर्यांना अधिकाधिक विमा मिळावा म्हणून काम केलं, माझ्या शेतकर्यांची जीवापाड काळजी घेतली. विविध ठिकाणच्या तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी तेथे निधी दिला, रस्ते, इमारतींसाठी कोट्यावधींचा निधी उपलब्ध करुन दिला. ही सर्व कामे जनतेला दिसतात. त्यामुळे पाच वर्ष मला जिल्ह्याची सेवा करण्याची संधी द्या, तुमच्या विश्वासाला पात्र ठरेन.आपल्याला एकदा दूध पोळलं आता ताकही फुंकून प्यायचं आहे. निवडणूक सुरु आहे, म्हणून आरामात बसू नका, डोळ्यात तेल घालून सतर्क रहा.येत्या १३ तारखेला बिनधास्तपणे कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून मला विजयी करा असे आवाहन पंकजाताईंनी केले.



### माझी भूमिका सामाजिक न्यायाची

आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात पंकजाताईंनी जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन सभेतून उपस्थितांसमोर मांडले. सामान्यातला सामान्य माणूस आमचा आहे. मला कोणतेही पद मिळवायची हौस नाही.मला काहीही कमवायची इच्छा नाही. मला जनतेचा विश्वास, आशिर्वाद अन् प्रेम मिळालं आहे. सामाजिक न्यायाची भूमिका घेताना सामान्यांना सर्व घटकांना पुढे घेवून जाते आहे. सर्व जाती–धर्माच्या समाजाला पुढे घेवून जाण्यासाठी मी काम करते. त्यांचाही माझ्यावर विश्वास आहे असेही पंकजाताईंनी यावेळी स्पष्ट केले.

### मी थकणार नाही...रुकणार नाही....मी कधी झुकणार नाही

पंकजाताई मुंडे यांचे चिंचाळ्यातील भाषण प्रचंड स्फुर्तीदायी अन् मतदारांमध्ये उत्साह निर्माण करुन गेले. येत्या १३ तारखेला माझ्यासाठी मतदान करताना तुम्ही तुमचे योगदान द्या.गाव असो की वाडी,वस्ती तांडा, प्रत्येक लेकींनी, माझ्या बंधूंनी आणि माता मावल्यांसह सर्व वडिलधार्यांनी तुमच्या लेकीला जिल्ह्याची सेवा करण्याची संधी देण्यासाठी शंभर टक्के कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून मतदान करावे असे आवाहन पंकजाताई मुंडे यांनी केले. 'मी थकणार नाही, मी रुकणार नाही.. तुम्हा जनतेच्या स्वाभीमानासाठी मी कधीही झुकणार नाही' असे सांगत तुमच्या लेकीला बळ द्या, शेवटच्या श्वासापर्यंत तुमच्यासोबत काम करेन. मी सर्वांना समान मानते हे माझे वचन आहे. त्यामुळे मतदान करुन माझी ओटी भरा असे आवाहन पंकजाताईंनी यावेळी केले.

# परळी वैंजनाथः बीड जिल्ह्याचा डीडीएस प्लॅन आमच्याकडे तयार !

धनंजय मुंडेंनी मांडली विकासाची ब्लू प्रिंट




पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली भारताची वाटचाल विश्वगुरू बनण्याकडे होत आहे. जगात भारत विकासावर स्वार होत असताना बीड जिल्ह्याचा विकासही त्याच पद्धतीने केला जाईल. यासाठी डिस्ट्रिक्ट डेव्हलपमेंट स्टॅटर्जी (डी डी एस )प्लॅन आमच्याकडे तयार असून या माध्यमातून जिल्ह्याच्या विकासासाठी आपल्या हक्काचा खासदार संसदेत असणे गरजेचे आहे. यासह विविध मुद्दयांवर बोलतांना कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी परळीत महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आयोजित संस्थाचालक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मेळाव्यात बीड जिल्ह्याच्या विकासाची ब्लू प्रिंटच सादर केली.

बीड जिल्हा हा ऊसतोड मजुरांचा जिल्हा, मागास जिल्हा अशा चुकीच्या पद्धतीने ओळखला जातो. मात्र ही ओळख पुसून कायमस्वरूपी विकसित जिल्हा म्हणून पुढे येण्यासाठी डीडीएस प्लॅन संपूर्णतः कार्यान्वित करणार आहोत. डी डी एस प्लॅन नुसार वरून खाली विकासाचे सूत्र बदलून खालून वर या पद्धतीने विकासाचे सूत्र बीड जिल्ह्यासाठी राबवण्यात येईल. बीड जिल्ह्याच्या सिंचनाचा मोठा प्रश्न असून मोठ्या प्रमाणात असलेली कोरडवाहू व हंगामी जिरायती शेती कायमस्वरूपी सिंचनाखाली आणण्यासाठी पश्चिम वाहिन्या मधून समुद्राला जाणारे पाणी बीड जिल्ह्याला आणण्यात येणार आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात सोयाबीन उत्पादक जिल्हा असलेल्या बीड जिल्ह्यात सोयाबीन प्रक्रिया उद्योग उभारण्यात येणार आहे. कृषी शिक्षणाची दोन महाविद्यालये परळीत लवकरच कार्यान्वित होत आहेत. त्याच बरोबर खाजगी मेडिकल कॉलेजही उभारण्यात येणार आहे.येत्या काळात सर्वात विकसित जिल्ह्याच्या स्पर्धेत बीड जिल्हा आणणारपंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या या प्रक्रियेत बीड जिल्हा हा अग्रेसर राहणार असून राज्यातील सर्वात विकसित जिल्ह्याशी येणाऱ्या पाच वर्षाच्या काळात बीड जिल्हा स्पर्धा करेल इतकी प्रगती करण्याचा प्रयत्न आमचा राहणार आहे. पंकजाताई मुंडेंची मोदी, शहा व अन्य राष्ट्रीय नेत्यांच्या मांदियाळीत उठबस आहे.त्यामुळे बीडच्या खासदार म्हणून नक्कीच मोठ्या प्रमाणावर विकास केंद्र सरकारमधून त्या निश्चितच खेचून आणतील.दरम्यान पंकजाताई मुंडे यांच्यासारखे दिग्गज नेतृत्व आपल्या बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार असून त्यांचा विजय निश्चित तर आहेच मात्र बीड जिल्ह्याची लेख नंबर एक अशा पद्धतीने त्यांचे प्रचंड मताधिक्याने सार्वभौम सभागृहात प्रवेश झाला पाहिजे यासाठी सर्वांनी सर्व शक्तीनिशी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

# पात्रुड येथील पुलाच्या पादचारी मार्गावर घाणीचे साम्राज्य

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील पात्रुड येथून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग खामगाव पंढरपूर रोडवर अनेकांनी आपली उपजीविका भागवण्यासाठी अनेक व्यवसाय उभारलेले आहेत. मात्र येथील व्यावसायिकावर ग्रामपंचायतचे कसलेच नियंत्रण नसल्यामुळे येथील चिकन सेंटरची अनेक दुकाने या ठिकाणी असून येथील चिकन वाले हे कापलेल्या कोंबड्यांचे पंख व मासयुक्त अवयव या ठिकाणी असलेल्या मेन फुलाच्या बाजूने केलेल्या पाचारी मार्गात टाकत आहेत त्यामुळे मोठ्या प्रमाणात या ठिकाणी दुर्गंधी पसरलेली आहे. तर याच ठिकाणी येथील सलून वाले कापलेले केस, ब्लेड व इतर वस्तू पुलावरच आणून टाकत आहेत. यामुळे पुलावरील पाचार्यांना चालण्यासाठी सोडलेला मार्ग हा येथे टाकलेल्या घाणीमुळे पूर्ण ब्लॉक करण्यात आलेला असून



कापलेल्या कोंबडयांचे पंख व मास युक्त इतर अवयव दररोज पुलावर फेकल्यामुळे परिसरात दुर्गंधी

या बाई चालणाऱ्यांना जीव मुठीत घेऊन पायी चालव लागते तर येथे टाकलेल्या घाणीमुळे पुलावरून पायी चालणाऱ्या नागरिकांना व वाहन चालकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. या दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. येथे चिकन सेंटर वाल्याकडून टाकण्यात येणाऱ्या पंख व मास युक्त पदार्थाच्या तुकड्यामुळे या ठिकाणी मोकाट कुत्र्यांचा वावर वाढला असल्यामुळे कुत्र्यांची संख्या देखील वाढली आहे. ही कुत्री पुलावरून पायी चालणाऱ्या नागरिकांच्या मागे चावा घेण्यासाठी लागतात. तर काही वेळेस दुचाकी वाहनाच्या देखील मागे धावतात यामुळे या ठिकाणी अपघात देखील होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. याच पुलालगत एक छोटेसे चहाचे हॉटेल असून या ठिकाणी लऊळ नं. १, लऊळ नं.२, परडी माटेगाव, कवडगाव, देवडी व इतर ठिकाणचे प्रवासी वाहनाची वाट बघत बसलेले असतात. या येणाऱ्या दुर्गंधीचा फार मोठा त्रास हॉटेलचालकास व या ठिकाणी वाहनाची वाट बघत बसणाऱ्या प्रवाशांना खूप मोठ्या प्रमाणात होत आहे. तरी येथील ग्रामपंचायत पुलावरील दुर्गंधीयुक्त कचरा हटवून पुलावरून चालण्यासाठी पुलावर केलेला पादचारी मार्ग मोकळा करेल का, तसेच बेसिस्तपणे वागणाऱ्या इतर व्यवसायिकावर व चिकन सेंटर वाल्यावर कारवाई करत पुलावर घाण आणून टाकणा–यास मज्जाव करेल का, व येथील नागरिकांना या घाणी पासून सुटका मिळेल का असे येथील जनतेतून ऐकण्यास मिळत आहे.

# शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची आरोग्य क्षेत्रात ज्वलंत कामगिरी रुग्णांच्या चेहऱ्यावर निरखळ हसू दिसून आले - बाजीराव चव्हाण

३० दिवसात ४४ रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून मिळवून दिले ३१ लाख ०५ हजार रुपयांची भरघोस मदत.आरोग्यदूत बाजीराव चव्हाण गोरगरीब जनतेचा कैवारी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष कार्यालय बीड ,मध्ये रुग्णांच्या नातेवाईकांची गर्दी. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाने व मंगेश चिवटे यांच्या सहकार्याने ,व धर्मवीर प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष महा.राज्य, बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्नामुळे एक महिन्यात मिळाली ४४ रूग्णांना ३१ लाख ०५ हजार रुपयांची भरघोस आर्थिक मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधी मधून मिळून दिली.

रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे हा प्राण मनात बाळगुन मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांनी वैद्यकीय सेवेचा घेतलेला वसा आणि त्यांचे सेवेकरी म्हणून बाजीराव चव्हाण यांच्या बीड येथे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा बाजीराव चव्हाण यांचे संपर्क कार्यालयातून गेल्या अनेक महिन्यांपासून आरोग्य सेवेच काम सातत्याने चालु आहे. या सेवे मधून आत्तापर्यंत ६०० पेशा जास्त रुग्णांना आर्थिक मदत मिळून दिली आहे.

बाजीराव चव्हाण यांच्या आरोग्य सेवाचा डंका बीड जिल्ह्यात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. त्यांनी केलेल्या आरोग्य सेवेचे कौतुक सर्वस्तरातून केले जात आहे. त्याचप्रमाणे चालु मार्च महिन्यात ४४ रूग्णांना भरघोस अशी ३१ लाख ०५ हजार रुपयांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षच्या माध्यमातून बाजीराव चव्हाण यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे आर्थिक मदत मिळाली जात आहे .यामुळे बीड जिल्ह्यात सर्वत्र वैद्यकीय क्षेत्रात एक आशेचा किरण म्हणून गोरगरीब सर्वसामान्य लोकांना आरोग्यदूत बाजीराव चव्हाण यांच्याकडून येणाऱ्या काळात खूप मोठ्या अपेक्षा वाढल्या असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयावर लोकांची मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत आहे. बाजीराव चव्हाण करत असलेल्या आरोग्य सेवेतून लोकांची होत असलेले आर्थिक मदत



त्यामुळे गोरगरीब लोकाना या मदतीचा खुप मोठा आधार मिळत आहे.कित्येक रुणाचे पैसे मूळ उपचार होत नव्हते ते आज बाजीराव चव्हाण यांच्या माध्यमातून त्यांना त्यांच्या व्याधी पासून मुक्तता मिळत आहे.त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळत आहे.

मार्च महिन्यांत ३० दिवसात मिळलेल्या रुग्णाची नावे व रक्कम खाली दिल्याप्रमाणे...

रुग्णाचे नाव १) राधिका रतन शिंदे गाव कुर्ला बीड आजार नवजत बालक मदत पन्नास हजार रुपये २) ओमकार जालिंदर गर्जे गाव डोंगर किनी आजार अपघात मदत १ लाख रुपये ३) अशोक सुभाष वाडेकर गावा कडा आष्टी आजार कर्करोग मदत १ लाख रुपये ४) दिपाली शुभम पवार गाव अहमदनगर आजार नवजात बालक मदत ५० हजार रुपये ५) मंगल उद्धव कदम गाव इमामपूर आजार नवजात बालक मदत ५० हजार रुपये ६) मोहित दुर्गानंद सांगळे गाव परळी आजार अपघात मदत ७५ हजार रूपये ७) दिनेश वासुदेव पाटील गाव जळगाव आजार आपघात मद १ लाख रुपये ८) शिवमय महेश शिंदे गावा मदनगर आजार केमोथेरपी मदत ५० हजार रुपये ९) भोले गणेश मुरलीधर गाव गेवराई आजारात मदत १ लाख रुपये १०) सुकलाल राजाराम कुंभार गाव जळगाव आधार मेंदू ग्रुप मदत ५० हजार रुपये ११) संजीवनी रविंद्र गुरव गाव सिंदखेड आजार मेंदू रोग मदत ५० हजार रुपये १२) ज्ञानेश्वर लालासाहेब जाधव गाव लातूर आजार विशेष प्रकरण मदत १ लाख रुपये १३) महेश नामदेव घुले गाव पाटोदा आजार आपघत मदत १ लाख रुपये १४) राणा बाई कृष्ण खरमाटे बाजार नवजात बालक ५० हजार १५) शहाजी अनादीम सय्यद आजार नवजात बालक ५० हजार १६) पूजा लक्ष्मण शेळके आजार नवजात बालक ५० हजार १७) नितीन बाबुराव आडे आजार अपघात ७० हजार १८) पंढरीनाथ कोंडाजी उदवंत आजार मेंदू रोग १ लाख १९) पांडुरंग संभाजी वाघमारे तर मेंदू रोग १ लाख २०) चांदनी मुस्त केम सय्यद आजार केमोथेरपी ५० हजार २१) बाबुराव अर्जुन वाघ आजार आजार मेंदू रोग ५० हजार २२) नेहा मुक्तार शेख आजार हजार बालक ५० हजार २३) वर्षा मधुकर कोकाट आजार नवजात बालक ५० हजार २४) सुजाता इंदर वाघमारे हजार नवजात बालक ५० हजार २५) सीमा रामेश्वर राऊत आजार नवजात बालक ५० हजार २६) लक्ष्मी विष्णू पावसकर कर्करोग एक लाख रुपये २७) संतोष बाजीराव केदार हृदयरोग एक लाख रुपये २८) लक्ष्मीबाई शिवाजी उगले कर्करोग एक लाख रुपये २९) सायली रोहित मस्के नवजात बालक पन्नास हजार रुपये ३०) आरती जयंत चंगारे - नवजात बालक पन्नास हजार रुपये ३१) आरती जयंत चंगारे इ नवजात बालक पन्नास हजार रुपये ३२) अक्षय प्रभू पवार कर्करोग एक लाख रुपये ३३) सय्यद सिमरन वसीम अली नवजात बालक पन्नास हजार रुपये ३४) रुक्मिणी लक्ष्मण डोईफोडे अपघात ८० हजार रुपये ३५) बद्रीनाथ शाम भराते हीप रिप्लेसमेंट एक लाख रुपये ३६) शारदा दिनकर गाडेकर नवचत बालक पन्नास हजार रुपये ३७) नीता कैलास चौधरी नवजात बालक पन्नास हजार रुपये ३८) जयश्री निवांत केदार नवजात बालक पन्नास हजार रुपये ३९) ओमकार चिंतामण लाके नी रिप्लेसमेंट ७५ हजार रुपये ४०) मंदाने का नागेश पाटील हृदयरोग एक लाख रुपये ४१) आफरीन मोहम्मद अन्सारी नवजात बालक पन्नास हजार रुपये ४२) वैजनाथ सोपान पोकळे मेंदू रोग पन्नास हजार रुपये ४३) एकानंद सदाशिव देशमुख मेंदू रोग एक लाख रुपये ४४) प्रभू तुळशी रामदास कर्करोग एक लाख रुपये कार्यालय पत्ता:- शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा बाजीराव चव्हाण जनसंपर्क कार्यालय बीड. मुक्ताई बिल्डिंग, मुक्ताई लॉन्स,बार्शी रोड बीड,४३११२२. ९१४३७१७७७७/ ९१४३७८७७७७

# चिंचाळ्यात पंकजाताई मुंडे यांच्या भाषणाने मतदार भावूक

## जिल्हयाच्या विकासासाठी पंकजाताईंना क्रमांक एकची पसंती देण्याचा निर्धार

चिंचाळा (वडवणी)

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज केलेल्या अभ्यासपूर्ण आणि विकासाचे व्हिजन घेऊन केलेल्या भाषणाने मतदार अक्षरशः भावूक झाले होते. जिल्हयाच्या विकासासाठी पंकजाताईंना सर्वाधिक क्रमांक एकची मते देण्याचा निर्धार मतदारांनी केला आहे.


पंकजाताई मुंडे यांची दुपारी चिंचाळ्यात सभा झाली. सर्व जाती धर्माचे मतदार बांधव यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाजप नेते रमेश आडसकर, मोहनराव जगताप, केशवराव आंधळे, जयसिंह सोळंके, वडवणी नगराध्यक्ष शेषराव जगताप, बाबरी मुंडे, संजय आंधळे, भाजपचे तालुकाध्यक्ष पोपट शेंडगे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, शिवाजीराव तिडके, आजबे ताई, मनसे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, शहराध्यक्ष करण लोंढे, बीड एम पवार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

पंकजाताई भाषणात म्हणाल्या, २००४ तसेच २००९ मध्ये जिल्हयात फिरत असताना रस्ते खूप खराब होते. सोयी सुविधांचा अभाव होता. जिल्हयाला विकासाच्या वाटेवर न्यायच असेल तर अगोदर पायाभूत सोयी केल्या पाहिजेत हे विचारात घेऊन मंत्री असताना विकासाचं नियोजन सुरू केलं. कामांचं डिझाईन स्वतः तयार केलं आणि त्यातून झालेली कामं आज दिसत आहेत.राजकारणात थापा मारून यशस्वी होता येत नाही .राजकारणात चांगली माणसं रहावीत यासाठी तुमचा प्रयत्न आवश्यक आहे.

### आडसकर-जगताप-जयसिंह सोळंकेंसह महायुतीचे नेते व्यासपीठावर

### तुमचं माझं नातं अतुट आहे.

गरिबांच्या पोटी नुसत जन्म घेऊन उपयोगाचं नसत तर गरिबांविषयी कळवळा पाहिजे. मी गरिबांच्या पोटी जन्म घेतला नसला तरी गरीबाविषयी आस्था आहे, त्याचेसाठी खूप काहीतरी करायचं. मुस्लिम बांधवांना विरोधक उगीच घाबरवत आहेत. त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आमची...केंद्राचा कायदा मुस्लिमांच्या विरोधात नाही. भूल थापाना बळी पडू नका.शंभर टक्के मतदान करा.पाच वर्षे सेवा करण्याची संधी द्या.लेकीला बळ द्या असं आवाहन पंकजाताईंनी केलं.



### रमेश आडसकर, मोहन जगताप

पंकजाताई मुंडे यांनी पालकमंत्री असताना जेवढी कामं जिल्हयात तेवढी कुणाच्याच काळात झाली नाहीत. त्यांच्या रूपाने विकासाच व्हिजन असलेलं नेतृत्व लाभलं आहे. त्यांचा विजय तर निश्चित आहेच तथापि त्यांना विक्रमी मताधिक्याने निवडून द्यावं असं आवाहन रमेश आडसकर, मोहन जगताप यांनी यावेळी केलं.

### आरक्षणाचा या निवडणूकीशी संबंध लावू नका - सोळंके

या निवडणूकीत पंकजाताई सारख्या कणखर व विकासाला पुढे घेऊन जाणाऱ्या नेत्या उभ्या आहेत. विकास पाहिजे असेल तर पंकजाताईं शिवाय पर्याय नाही. त्याशिवाय आपल्या भागाची प्रगती होणार नाही. मराठा आरक्षणाचा विषय विधानसभेचा आहे. लोकसभेचा नाही. आरक्षणाचा विषयाचा संबध या निवडणूकीत लावू नका.याप्रसंगी केशवराव आंधळे यांनी देखील आपल्या भाषणात पंकजाताईंना विजयी करण्याचं आवाहन केलं. बंजारा महिलांनी यावेळी पामडी देऊन पंकजाताईंचा सत्कार केला. सभेस मतदारांनी मोठी गर्दी केली होती.

# जेतवन बुद्ध विहार कल्याणनगर येथे श्रीमती सागरबाई टेकाळे ग्रंथालयाचे उद्घाटन

## प्रा. सर्जेराव टेकाळे यांच्या ज्ञानदीप ई लर्निंग कोचिंग क्लासेस पुणे यांचा स्तुत्य उपक्रम

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यातील कल्याण नगर येथील जेतवन बुद्ध विहार येथे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना येथील जनतेला थोर महापुरुषांच्या कार्याची माहिती व्हावी यासाठी प्राध्यापक सर्जेराव टेकाळे यांच्यावतीने त्यांच्या मातोश्री सागरबाई रंगनाथ टेकाळे यांच्या नावे ग्रंथालयाचे उद्घाटन करण्यात आले. सविस्तर सविस्तर वृत्त असे की, दि. २९/४/२४ रोजी थोर महापुरुषांचे ९५० पुस्तकांचे ग्रंथालय जेतवन बुद्ध विहार कल्याण नगर येथे प्रा. सर्जेराव टेकाळे/(संस्थापक अध्यक्ष ज्ञानदीप टेकाळे ई लर्निंग कोचिंग क्लासेस पुणे ) यांच्या वतीने सुरू करण्यात आले आहे. थोर समाज सुधारकांच्या पुस्तकांचे वाचून करून व ग्रामीण भागातील समाज सुधारण्यासाठी येथील विद्यार्थी व जनतेमध्ये महापुरुषाविषयी बौद्धिक ज्ञान वाढीसाठी व थोर महापुरुषांच्या विचाराबद्दल त्यांच्या



कार्याबद्दल वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न केला जात आहे. शैक्षणिक क्षेत्रात हुशार असणाऱ्या विद्यार्थ्यांचे बौद्धिक, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातील वाचन क्षमता वाढविण्यासाठी व वाचन करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून या ग्रंथालयाचा उपयोग भविष्यामध्ये निश्चितच होणार आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित वाचाल तर समाजत टिकाल या प्रमाणे मानव सुरक्षित व समृद्ध आणि सुसंस्कृत बनवण्यासाठी. वाचनालय सुरू करण्यात आले आहे. दि. २९/४/२४ रोजी जेतवन बुद्ध विहार कल्याणनगर येथे श्रीमती सागरबाई रंगनाथ टेकाळे ग्रंथालय यांचे उद्घाटन प्रा. टेकाळे सर यांच्या हस्ते सकाळी ११ वा. करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी ग्रंथ दिंडी कल्याणनगर येथे काढण्यात आली त्यावेळी जेतवन बुद्ध विहारातील पदाधिकारी, कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते. त्यावेळी चंद्रकांत किर्ते यांनी सुत्रसंचलन केले तर हिरामण किर्ते यांनी आभार व्यक्त केले.

# सिद्धेश्वर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली मतदार जागृतीची शपथ

माजलगाव ।प्रतिनिधी

भाशिप्र संस्था अंबाजोगाई संचलित सिद्धेश्वर महाविद्यालयात निवडणूक साक्षरता कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवमतदार युवक -युवती तसेच सर्व नागरिकांत मतदान करण्याबाबत जागृती व्हावी या दृष्टीने मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांनी व मतदारांनी निर्भयपणे मतदान करून कुठल्याही भूलथापांना बळी पडणार नसल्याची शपथ दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, प्रा. संतोष लिंबकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. कमलकिशोर लड्डा, डॉ. रमेश गटकळ, डॉ. जिजाराम बागल यांनी प्रत्येक वर्गात जावून मतदान हे अनमोल दान आहे हे 'मतदारांसाठीच्या प्रतिज्ञेद्वारे सांगितले. सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर च्या द्वारे सर्व महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा ह्या अंतिम टप्प्यात आहेत. त्यानुसार परीक्षा सुरु होण्याच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी भयमुक्त मतदान करून लोकशाही बळकट करण्यासाठी अवाहन सर्वांना करण्यात आहे.




या पक्षाच्या युवा सेना बीड जिल्ह्याच्या उपजिल्हाप्रमुख पदी आमचे मित्र अशफाक भाई शेख यांची जिल्ह्याचे धडाडीचे जुने निष्ठावंत शिवसैनिक युवा सैंनीक अशफाक भाई शेख यांची निवड झाल्या बद्दल त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा



बीड लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी शिवसंग्राम भवन, बीड येथे शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे सदिच्छा भेट घेऊन आशिर्वाद घेतले.यावेळी जनभावना लक्षात घेत बीड लोकसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय मागे घेतला, त्याबद्दल डॉ. ज्योतीताई मेटे यांचे त्यांनी आभार मानले.याप्रसंगी शिवसंग्राम चे ज्येष्ठ नेते प्रभाकर आप्पा कोलंगडे, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, सुहास पाटील, प्रा. सुभाष जाधव आदी सह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

# डॉ,दीपाली टीएचओ, गौरव यांची सह कक्ष अधिकारी पदी निवड

## मुख्यमंत्री सहायता निधी सहकक्ष प्रमुख उद्धव मडके परिवारांच्या वतीने सत्कार

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत डॉ, दिपाली चंद्रकांत पुरी हिची तालुका आरोग्य अधिकारी पदी तर धाकटे बंधू गौरव चंद्रकांत पुरी यांची एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून सहाय्यक कक्ष अधिकारी मंत्रालय मुंबई येथे निवड झाली आहे,

येथील आर बी अट्ठल महाविद्यालयातील कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्राध्यापक चंद्रकांत पुंडलिक पुरी यांचे मोठे चि, वैभव पुरी, हा एमपीएससी मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेतून राज्य कर निरीक्षक एसटीआय पदी माझगाव मुंबई येथे रुजू आहेत, तर मोठी कन्या डॉ, दिपाली पुरी जोशी ही महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागात माणगाव रायगड येथे तालुका आरोग्य अधिकारी



म्हणून तर धाकटा मुलगा गौरव पुरी हा सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून मंत्रालय मुंबई येथे निवड झाली आहे, प्रा, सी, पी, पुरी, यांच्या कुटुंबातील तिन्ही मुलांची अधिकारी होण्याची बाब ही अभिमानास्पद व गौरवशाली आहे, गौरव पुरी यांच्या गावी जाऊन भोगलगाव गावच्या माजी सरपंच सौ, सुशीला ज्ञानेश्वर मडके, उद्धव मडके मुखमत्री सहायता निधी सहकक्ष प्रमुख बीड प्रा .सरिता उद्धव मडके सचांलिका ऋलहरा-लरलीी, आदींनी सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

# उन्हात लग्नाला जाताना ही काळजी घ्यावी - डॉ जितीन वंजारे

सध्या उन्हाचा पारा खूप जास्त चढला असल्यामुळे उन्हामध्ये बाहेर पडताना किंवा लग्न समारंभाला जाताना काय काळजी घेतली पाहिजे यावर आज आपण विचार करू.शासनाने उन्हाचा रेड अलर्ट दिल्या गेल्यामुळे उन्हामध्ये बाहेर पडू नये परंतु काही महत्त्वाचं काम,लग्न समारंभ किंवा इतर गोष्टीसाठी बाहेर पडावेच लागते तर आपण कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत आणि कोणत्या गोष्टी करू नयेत यावर प्रकाश टाकूयात. घरातून बाहेर पडताना महत्त्वाचं म्हणजे आपल्यासोबत दुपट्टा, गमजा,हात रुमाल आणि पाय मोजे घातलेले पाहिजेत, पायामध्ये बूट असणे गरजेचे आहे कारण उन्हाच्या झळा या तीव्र असून त्यामुळे पायाला जास्तीचा घाम येऊन डीहायड्रेशन होण्याची दाट शक्यता असते, अंग भरून कपडे घातले पाहिजे,कपडे रंगेबिरंगी न घालता पांढऱ्या रंगाचे कपडे घालणे महत्त्वाचे आहे. काळया रंगाची कपडे अजिबात घालू नयेत कारण काळया रंगावरती सूर्यप्रकाशाची किरणे एकत्र येतात त्यामुळे जास्तीचा उकाडा जाणू शकतो,जास्तीचे गरम होऊन चक्कर येऊ शकते. त्याचबरोबर घरातून उन्हामध्ये बाहेर पडताना पाण्याची बॉटल सोबत ठेवणे अत्यंत जरुरीचे आहे, त्याचबरोबर त्या पाण्यामध्ये लिंबू शरबत किंवा एनर्जी ड्रिंक सोबत असणं आवश्यक आहे, लिंबामध्ये सर्व इलेक्ट्रोलाइट्स असल्याकारणाने तुम्हाला लिंबू शरबत मुळे एक वेगळी एनर्जी येईल त्याचबरोबर डीहायड्रेशनचा धोका होणार नाही त्याचबरोबर सोबत नारळ पाणी घेणे जरुरीचे आहे.बाहेर चहा किंवा तस्तम पेय,कोल्ड्रिंक घेण्यापेक्षा नारळ पाणी आणि लिंबू पाणी पिलेले केव्हाही चांगले नारळ पाणी,लिंबू पाणी या द्रव्यांमध्ये इलेक्ट्रोलाइट्सचे भरपूर प्रमाण असल्याकारणाने तुम्हाला ड्रीहायड्रेशन होणार नाही. गाडीवर प्रवास करत असताना डोक्याला रुमाल बांधणे किंवा दुपट्टा बांधणे,तो वेळोवेळी ओला करून बांधणे,पूर्ण अंग झाकून घेणे खूप महत्त्वाचे आहे. उघड्या पार्ट वरती अतिनील सूर्य कीरणे पडल्यामुळे त्वच्याचा रंग काळपट होईल दुसरी गोष्ट तुमची त्वचा कोरडी होऊन किंवा त्या ठिकाणी भरपूर प्रमाणामध्ये घाम येऊन त्वचारोग होण्याची दाट शक्यता आहे घामोळ्या,गजकर्ण, नायटा हे होऊ शकत.लग्न



समारंभामध्ये गेल्यानंतर हवेशीर जागी बसण्यासाठी जावे खूप जास्त कोंदवाडा,कोंदट वातावरण, खूप जास्त गर्दी किंवा ज्या ठिकाणी व्हेंटिलेशन नाही अशा ठिकाणी गेल्यास एकमेकांचा स्पर्श झाल्यानंतर एकाचे त्वचारोग दुसऱ्यांना जाण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे खाज खुजली गचकरण अशा पद्धतीचे आजार एकाचे दुसऱ्याला होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सुरक्षित अंतर ठेवून लग्न समारंभामध्ये उपस्थित राहावे. लग्न समारंभामध्ये मांडव दिलेला असेल तर चौकोन बंदिस्त करू नये, मोकळी हवा इकडे तिकडे जाईल याची तजवीज करावी,नसता फॅन्स,कुलर किंवा इतर संसाधना वापरणे गरजेचे आहे लग्न समारंभाला जाताना भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे. जास्त तेलकट अन्न किंवा जास्तीचे गोड पदार्थ न खाता अगदी हलक अन्न किंवा अर्ध्या पोटी राहिलेले अति उत्तम जास्तीचा उकाडा असल्यामुळे पचनसंस्थेवर त्याचा परिणाम होत आहे त्यामध्ये फ्रीजमधील थंड पाणी पिल्यामुळे आतड्याला सूज येते,पोटामध्ये गॅस तयार होतो,पोट साफ होत नाही,अपचन,करपट ढेकर,अनिद्रा आणि पित्ताचा त्रास झाल्यामुळे चेहऱ्यावर निस्तेजपणा चेहऱ्यावर काळपट येणे डोळ्याखालील भागामध्ये काळी त्वचा होणे किंवा उदासीनता वाटणे या व अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते त्यामुळे स्वच्छ भरपूर पाणी प्यावे. लग्न समारंभामध्ये डाळभात आणि सलाड जास्तीत जास्त खावे,त्यामध्ये काकडी गाजर व फळे इत्यादी गोष्टी जास्तीची खावी त्यामुळे पचनास लाभ होईल आणि पाण्याची कमतरता भासणार नाही.लग्न समारंभाला जाताना उन्हामध्ये पायी चालणे, अनवाणी चालणे, मद्यप्राशन करणे, अति तेलकट तिखट तळलेले पदार्थ खाणे इत्यादी गोष्टींमुळे आपल्या आरोग्याला धोका होऊ शकतो त्यामुळे तुम्हाला उलटी मळमळ पित्त आणि पोटाचे त्रास होऊन दैनंदिन जीवनामध्ये त्याचा अपव्य होऊ शकतो हे टाळण्यासाठी वरील सांगितल्याप्रमाणे सोपे साधे आणि सरळ नियम वापरावे असे आव्हान सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध डॉक्टर डॉ.जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी केले आहे.



# अध्यापन क्षेत्रातील ४० वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर मुहम्मद मुस्लीम कबीर सेवानिवृत्त

## शैक्षणिक, पत्रकारिता, साहित्यिक, सामाजिक क्षेत्रातील मित्रांकडून सन्मान


लातूर (प्रतिनिधी)

जिल्ह्यातील औसा तालुक्यात असलेल्या हज़रत सुरत शाह उर्दू शाळेचे शिक्षक मुहम्मद मुस्लीम कबीर यांनी अध्यापन क्षेत्रात ४० वर्षे कर्तव्य बजावले. नियत वयोमानानुसार ते दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. यावेळी फ़खधरुद्दीन अली अहेमद एज्युकेशन सोसायटीचे अल्हाज शेख मुहम्मद उर्फ छोटे मियाँ, ड. समीउद्दीन पटेल, मुख्याध्यापक मुहम्मद शफीउद्दीन पटेल, झाकीर जरगर, डॉ. वहीद कुरेशी यांनी मुहम्मद मुस्लीम कबीर

यांच्या शैक्षणिक, पत्रकारितेतील आणि सामाजिक योगदनाबद्दल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन शेख मुजीब शब्बीर आणि आभार बदीउद्दीन पटेल यांनी मानले. शाळेतर्फे कबीर सरांना भेट वस्तू मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी मुहम्मद अब्दुल गनी सर, कु.रजिया बाजी, कु.शेख एम.एम.बाजी, शबाना मुंगले बाजी, शगुफ़्ता मन्यार बाजी, यासिर अराफत काझी, नजीबुद्दीन पटेल, जिलानी काझी व इतर मित्र उपस्थित होते. ऑर्बिट इंग्लिश स्कूलचे सचिव ड. इक्बाल शेख,

अझीम ज्युनिअर कॉलेजचे पर्यवेक्षक डॉ. खलील सिद्दीकी, सोलापूरचे सुप्रसिद्ध पत्रकार अय्युब नल्लामंदु, उस्मानाबादच्या शिक्षक संघाचे खिजर मोरवे, लातूरचे सुप्रसिद्ध पत्रकार शेख अब्दुस् समद, जिलानी मुल्ला राज, उर्दू शिक्षक मुहम्मद शरीफ हन्नुरे आणि संस्थेच्या इतर मित्रांनी लेखांच्या माध्यमातून मुहम्मद मुस्लीम कबीर यांच्या शैक्षणिक, सामाजिक, पत्रकारितेतील आणि साहित्यिक सेवा यापुढेही सुरू ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

यावेळी हिंदी साप्ताहिक लातूर रिपोर्टरचे संपादक मज़हर पटेल आणि कार्यकारी संपादक ड. इक्बाल शेख यांनी सांगितले की, मुस्लीम कबीर यांचे सार्वजनिक जीवन आणि सेवा यावर आधारित विशेषांक लवकरच प्रकाशित करण्यात असल्याचे म्हटले.




बीड –सी.ए.बी.बी.जाधव यांचे ज्येष्ठ बंधू यांच्या प्रथम पुण्यतिथी निमित्त बीड येथील निवासस्थानी पुष्प अर्पण करुन अभिवादन करताना वंचित बहुजन आघाडी उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्यासह डॉ.नितिन सोनवणे, अनिल घुमरे पाटील, प्रभाकर अप्पा कोलंगडे, बालाजी जगतकर संपादक,अजय सरवदे,आदी दिसत आहेत.

# विकासाच्या मुद्द्यावर ४०० पारचा नारा देत पंकजाताईंना संसदेत पाठवा – डॉ.ऋषिकेश विघ्ने

## विरोधक फक्त थापा मारण्यात व्यस्त, विकासाच्या गोष्टी त्यांच्या ध्यानात नाहीत – डॉ ऋषिकेश विघ्ने

**आष्टी पाटोदा शिरूर मधून सर्वाधिक लिडने पंकजाताईंना निवडून आणणार; जातीवादाला बळी पडणारी जनता आता बीड जिल्ह्यात राहिली नाही**

बीड (प्रतिनिधी)

बीड लोकसभा निवडणुकीचे रणांगण चांगलेच तापले आहे. महायुती कडून भाजपा सचिव मा.पंकजाताई गोपिनाथराव मुंडे तर महाविकास आघाडीकडून बजरंग सोनवणे अशी लढत आपल्याला पाहायला मिळत आहे. यातच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री राहिलेल्या गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या कन्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांनी त्यांच्या कार्यकाळात जिल्ह्यात विकास कामांचा महापूर आणला – मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलयुक्त शिवार योजना,महिला बचत गट अशा असंख्य योजनेतून जिल्ह्याला नवी ओळख निर्माण करून दिलीआणि विरोधी उमेदवार उभा असलेल्या आघाडी ज्यांच्या आघाडीच्या नावात महा'विकास' हा शब्द आहे परंतु कार्य मात्र 'भकास' असलेले विरोधी उमेदवार सध्या जनतेत जाऊन मत मागत आहेत परंतु त्यांनी मागच्या लोकसभेला पराजित झाल्यानंतर कोणत्या समाजाच्या विकासासाठी किंवा मागण्यांसाठी लढा दिला आहे ? असा प्रश्न जनतेत पडलेला आहे. त्यामुळे जनतेने विरोधकांच्या भूलथांपाना बळी न पडता पंकजाताई मुंडे यांना साथ द्यावी असे आवाहन भारतीय जनता पार्टी व मित्रपक्ष प्रणित महायुतीचे डॉ ऋषिकेश विघ्ने यांनी सांगितले आहे. बीड जिल्ह्याची राजकीय परिस्थिती पाहिली असता सध्या जातीपातीच्या माध्यमातून मतदान मागताना काही महाभाग दिसत आहेत परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचा लढा दिलेला नाही कधीही समाजाच्या उपयोगी आलेले नाहीत. वेळीच जनतेने सावध होऊन विकासाच्या मुद्यावर ही लोकसभेची निवडणूक आणावी जेणेकरून बीड जिल्ह्यातील जनतेच्या मागण्या स्पष्ट व योग्य पद्धतीने संसदेत मांडल्या जातील व जिल्ह्याचा विकास दुपटीच्या वेगाने होईल. बीड जिल्ह्यात महायुतीने सर्वात जास्त विकासकामे केलेली आहेत आणि ती अशीच चालू रहावीत व बीड जिल्ह्याचा फक्त आणि फक्त विकास होईल ह्याकडे जनतेने लक्ष देण्याची सध्या गरज आहे. येत्या १३ मे रोजी मोठ्या सन्मानाने आपल्याला पंकजाताई मुंडे यांना भरघोस मतदान करुन संसदेत पाठवायाचे आहे. जलयुक्तशिवार योजना सारख्या जिल्ह्याची दिशा बदलणाऱ्या संकल्पना पंकजाताई मुंडे यांनी या राज्यात राबविल्या जेणेकरून दुष्काळी भाग देखील सुजलाम सुफलाम होतील. पंकजाताईंची भाषणकौशल्याची



ताकातीने बीड जिल्ह्याचे नाव देशाच्या पटलात प्रसिद्ध झाल्याशिवाय राहणार नसल्याचे भारतीय जनता पार्टी चे डॉ ऋषिकेश विघ्ने यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे.

# बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची धमक फक्त पंकजाताई मुंडे यांच्यातच :अक्षय बाळासाहेब बांगर

## पंकजाताईंनी नेहमीच १८ पगड जातीच्या समाजाला साथ दिली

(प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासाची धमक एकट्या पंकजाताई मुंडे यांच्यातच आहे. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या विचारांचा वारसा जसा पंकजाताई समर्थपणे चालवत आहेत. त्याचप्रमाणे बीड जिल्हा सुजलाम सुफलाम करण्याचे मुंडे साहेबांचे स्वप्न पंकजाताईच पूर्ण करू शकतात. एक सक्षम आणि ताकदीचा खासदार संसदेत पाठविण्यासाठी पंकजाताईंना सर्वाधिक लिडने विजयी करा असे राष्ट्रवादी काँग्रेस युवा मोर्चा सोशल मीडिया तालुकाध्यक्ष अक्षय बाळासाहेब बांगर यांनी केले आहे.



लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांनी अठरापगड जातींना न्याय देण्याचा आणि त्यांना सोबत घेण्याचा प्रयत्न केला. त्याप्रमाणे पंकजाताईंनीही सबका साथ सबका विकास या माध्यमातून सर्व समाजाला सोबत घेतलेले आहे. त्यांनी कधी जातीभेद केला नाही. जातीपातीची बंधने कधी पुढे केली नाहीत. विकास च्या बाबतीतही कधी दुजाभाव केला नाही. बीड जिल्ह्याची राजकीय परिस्थिती पाहिली असता सध्या जातीपातीच्या माध्यमातून मतदान मागताना काही महाभाग दिसत आहेत परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारचा लढा दिलेला नाही कधीही समाजाच्या उपयोगी आलेले नाहीत. वेळीच जनतेने सावध होऊन विकासाच्या मुद्यावर ही लोकसभेची निवडनुक आणावी जेणेकरून बीड जिल्ह्यातील जनतेच्या मागण्या स्पष्ट व योग्य पद्धतीने संसदेत मांडल्या जातील व जिल्ह्याचा विकास दुपटीच्या वेगाने होईल. बीड जिल्ह्यात महायुतीने सर्वात जास्त विकासकामे केलेली आहेत आणि ती अशीच चालू रहावीत व बीड जिल्ह्याचा फक्त आणि फक्त विकास होईल ह्याकडे जनतेने लक्ष देण्याची सध्या गरज आहे.

येत्या १३ मे रोजी मोठ्या सन्मानाने आपल्याला पंकजाताई मुंडे यांना भरघोस मतदान करुन संसदेत पाठवायाचे आहे. जलशिवार योजना सारख्या जिल्ह्याची दिशा बदलणाऱ्या संकल्पना पंकजाताई मुंडे यांनी या राज्यात राबविल्या जेणेकरून दुष्काळी भाग देखील सुजलाम सुफलाम होतील. पंकजाताईंची भाषणकौशल्याची ताकातीने बीड जिल्ह्याचे नाव देशाच्या पटलात प्रसिद्ध झाल्याशिवाय राहणार नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया तालुकाध्यक्ष अक्षय बाळासाहेब बांगर यांनी प्रसिद्धीमाध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

# आंबेजोगाई येथील आज होणाऱ्या अँड.प्रकाश आंबेडकरांच्या सभेमुळे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या विजयावर होणार शिक्का मोर्तब

बीड (प्रतिनिधी)

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा प्रचार सर्वात आघाडीवर असून आज अंबेजोगाई येथे प्रकाश आंबेडकर यांची जाहीर सभा होत आहे आंबेडकर यांच्या सभेने वंचित बहुजन आघाडी चे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या विजया वर शिक्का मोर्तब होणार आहे

वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचाराने बीड जिल्यात चांगलीच ग्रीप घेतली असून गावा गावात निवडून येणार गॅस सीलेंडर बाकी होणार सरेंडर अशा घोषणा गावा गावातील कार्यकर्ते देताना दिसत आहेत तर गेली तीन दिवसा पासून प्रत्येक गाव, तांडा, वस्ती वर जाऊन प्रचार करत करत आज होणाऱ्या सभेस उपस्थित



राहण्याचे निमंत्रण देत आहेत त्या मुळे प्रत्येक गावात एकच चर्चा मराठा, दलित, मुस्लिम वंजारी, बंजारा धनगर साळी, माळी ,कोळी सर्व जातीच्या आरक्षण साठी खंबीर पने पाठीशी उभे असलेल्या ऍड प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीलाच मतदान करायचे असे मतदार बोलू लागले आहेत तर आज वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ऍड प्रकाश आंबेडकर यांची अंबेजोगाई येथे सभा होणार असून मतदारात एक नवचैतन्यनिर्माण होऊन वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या विजयावर शिक्का मोर्तब होणार आहे.

# महिलांनी सक्रीयपणे मतदानात सहभाग नोंदवावा-जिल्हा निवडणुक अधिकारी

बीड -महिलांनी सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक क्षेत्रात प्रगती साधली आहे. मतदारांमध्ये जनजागृतीचे कामही महिला उत्कृष्टपणे पार पाडीत आहे. बीड लोकसभा मतदार संघातील निवडणूका सोमवार दिनांक १३ मे ला होणार आहेत. यामध्ये महिलांनी निसंकोचपणे स्वविवेकाने आपला मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले.

बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये ५५ महिला मतदान केंद्र राहतील. या मतदान केंद्राच्या ठिकाणी महिला अधिकारी कर्मचारी राहतील.

महिलांचा मतदानात सक्रिय सहभाग असावा यासाठी स्तनदा माता, गरोदर महिला, लहान बालके असलेले आई यांच्यासाठी मतदान केंद्रावर तात्पुरत्या अंगणवाड्या उभारण्यात येत आहेत. या ठिकाणी पाळणा लहान मुलांसाठी, खेळणे असणार आहेत. स्तनदा माता आपल्या बाळांना याठिकाणी दूध पाजू शकतात. आपल्या लहान बालकांना तिथे ठेवून मत द्यायला जाऊ शकतात, गरोदर माता तिथे काही काळ आराम करू शकतात. अशी तयारी प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे.

महिलांमध्ये कोणतही काम चोखपणे करण्याची जिद्द चिकाटी, ध्येय असते. एकही महिला मतदार मतदानापासून वंचित राहणार नाही यासाठी प्रशासन काम करीत आहे आपण पुढे येऊन मतदान करा.

प्रशासनातील महिला अधिकारी टक्का वाढवण्यासाठी प्रयत्नरत

जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे या स्वतः दिवस-रात्र काम करून बीड लोकसभा मतदार संघातील मतदारांनी अधिकाधिक मतदान करावे, यासाठी प्रयत्नरत आहेत. त्यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात सर्वच अधिकारी कर्मचारी मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तयारीत आहेत.

यासह बीड विधानसभा मतदार संघातील सहाय्यक निवडणूक अधिकारी कविता जाधव यादेखील अधिकाधिक मतदान विधानसभा मतदारसंघात व्हावे, यासाठी तयारीला लागल्या आहेत.

कायदा सुव्यवस्था नीट राहावी, याकरीता आंबेजोगाईच्या अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके या सज्ज आहेत.महिलांनी मतदानाच्या दिवशी



सक्रिय राहावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील यादेखील प्रयत्न करत आहेत.माजलगाव तालुक्याच्या तहसीलदार वर्षा मनाळे, तहसील मध्ये निवडणुकीची प्रक्रिया नीट व्हावी यासाठी कार्यरत आहेत.माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीच्या सदस्य सचिव तथा मीडिया कक्षाच्या प्रमुख अंजू निमसरकर या माध्यमांवर करडी नजर ठेवून आहेत माध्यमात येणाऱ्या आचारसंहिता भंगाच्या तसेच पेड न्यूज संदर्भातील बातम्यांवर वॉच ठेवून आहेत.यासह तहसीलदार तेजस्विनी जाधव आणि सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती वसुधा रघाताटे या ही निवडणुकीच्या जबाबदाऱ्या कर्तव्यपूर्णरित्या पार पडत आहेत. याशिवाय विविध विभागातील निवडणुकीची प्रक्रिया पार पडणाऱ्या अधिनस्ताच्या आदेशाचे काटेकोरपणे महिला कर्मचारी पालन करीतआहेत.या सर्व महिला अधिकाऱ्यांनी व महिला कर्मचाऱ्यांनी आवाहन, केले आहे बीड लोकसभा मतदारसंघातील महिलांनी बाहेर पडून आपला मतदानाचा हक्क बजावावा.

# निसर्गानेच गाऱ्हाणे ऐकले?

## पैठणचा उजवा कालवा फुटला अन..८५ गावांना फायदा झाला

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातून नागमोडी आकाराने विविध गावातून जात असलेला पैठणचा उजवा कालवा मागील काही दिवसापुर्वी गेवराई तालुक्यातील तळणेवाडी शिवारात फुटून हजारो क्युसेक्स पाणी वाया जात अनेक वस्त्यामध्ये घुसले. खबरदारीचा उपाय म्हणून पाटबंधारे विभागाने गुळज बंधारा येथील कालव्याचे दरवाजे बंद करून गोदावरी नदी पात्रात पाण्याचा विसर्ग केला. त्यामुळे तालुक्यातील गोदावरी नदी पात्राच्या पाणीपातळीत वाढ होत गेली. याच पात्रातील पाणी न.प.च्या गेवराई येथील टाकीतून गेवराई तालुक्यातील ८५ गावांना पिण्याच्या पाण्याचा टँकरमधून पुरवठा करण्यात येत आहे. तसेच जिल्ह्यातील अनेक जवळपासच्या गावात देखील वेळोवेळी पुरवठा करण्यात येत आहे.

वरिल सर्व परिस्थिती पाहता पैठणचा उजवा कालवा फुटला अन गेवराईला फायदा झाला असे बोलले जात आहे.



दरम्यान मागणी करुनही गोदावरीच्या बलाढ्य पात्रात पैठणच्या धरणातून पाणी सोडले नसते, मात्र कालवा फुटल्याने नाईलाजाने गोदावरी नदी पात्रात सोडावे लागले.गेवराई तालुक्यात सध्या विविध गावात ८५ टँकरने पाणी पुरवठा करण्यात येती आहे. तालुक्यात सध्या पाणीटंचाईचा झळा लागत आहे. त्यातच गोदावरी नदी पात्रत पैठणच्या जायकवाडी धरणातून पाणी सोडण्याची विविध गावातील नागरिक करत आहे. मात्र पाणी सोडण्यात येत आहे. त्यातच गेवराई तालुक्यातील विविध गावातून नागमोडी आकाराने जात असलेल्या पिठणच्या कालव्याला भरमसाठ पाणी सोडण्यात आले आहे. मात्र तळणेवाडी परिसरात हा कालवा फुटल्याने हजारो क्युसेक्स पाणी वाया जात परिसरातील शेतवस्तीवर घुसले. पाणी वाया जाऊ नये म्हणून पाटबंधारे विभागाने गुळज बंधाऱ्यातील कालव्याचे दरवाजे बंद करून ते पाणी गोदावरी नदी पात्रात विसर्ग सुरु केला आहे. त्यामुळे गेवराई तालुक्यातील गोदावरी नदी पात्रात पाण्याची वाढ काहीशी झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान शहागड येथील पैठणच्या जायकवाडी धरणातून थेट गेवराई येथे पाईप लाईन सुरु असून या माध्यमातून न.प. गेवराई येथील पाण्याच्या टाकीतून गेवराईतील विविध उजव्या भागात ८५ टँकरमधून पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.शिवाय जिल्ह्यात देखील वेळप्रसंगी करण्यात आला व येत आहे. एकदंर पैठणच्या उजव्या कालव्यातील पाणी गोदावरी नदी पात्रत आल्याने ठिकठिकाणी या पाण्यात काहीशी वाढ होऊन पात्र भरल्याचे दिसून येत आहे.



### भाजपच्या भुलथापांची लोकांना चीड,

# त्यामुळे आता सत्ताबदल अटळ – आ. संदीप क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

भाजपच्या भूलथापांची आणि बोगसगिरीची लोकांना प्रचंड चीड आली आहे. त्यामुळे आता सत्ताबदल अटळ आहे. आपल्याइथे सुद्धा लोकांनी इंडिया आघाडीच्या उमेदवाराला म्हणजेच बजरंग सोनावणेंना आशीर्वाद देऊन दिल्लीला पाठवण्याचं ठरवलं आहे. असे मत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहरातील कॉर्नर बैठकीदरम्यान बोलताना व्यक्त केले.

गुरुवारी (दि. २) रोजी बीड शहरातील शिवाजीनगर व इस्लामपूरा भागात इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ आ. संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थित कॉर्नर बैठक झाल्या. यावेळी भाजपच्या हुकूमशाही वृत्तीने लोक त्रस्त झाले असून त्यांच्या बोगसगिरी आणि भुलथापांची लोकांना प्रचंड चीड आलेली आहे. सर्वसामान्यांना वेड्यात काढण्याचे काम या विचाराकडून झालेलं आहे. लोकांनी आता मनात पक्क ठरवलेलं असल्याने केंद्रात सत्ताबदल आणि बीड मतदारसंघात परिवर्तन अटळ असल्याचे आ. संदीप क्षीरसागर यांनी सांगितले. या बैठकांसाठी पक्षपदाधिकारी, कार्यकर्ते, संबंधित भागातील व शहरातील विविध भागातून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्यच्या मराठवाडा उपाध्यक्ष पदी यांची निवड



**बीड (प्रतिनिधी)**

**काल दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी दुपारी २ वाजता बीड येथील लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य च्या कार्यालया जवळील गार्डन मध्ये महाराष्ट्र राज्य मध्ये लोकशाही पत्रकार संघ निवड जाहीर करण्यात आल्या आहेत.**

लोकशाही पत्रकार संघाचे सं.अ.भागवत वैद्य यांच्या आदेशानुसार राणीताई शेख (प्रदेश उपाध्यक्ष पोलीस विकास समिती), मुंबई प्रदेश अध्यक्ष सुलेक्षणा कांबळे( कला,क्रीडा व सांस्कृतिक कार्य विकास समिती), बाबासाहेब मणेरे , अमोल भांगे,डॉ.अशोक मसलेकर,

यांनी केली. यावेळी नंदनी ओहाळ म्हणाल्या की, गाव,सर्कल,तालुका, शहर कार्यकारणी लवकरच करण्यात येईल. तसेच लोकशाही पत्रकार संघ वाढीसाठी काम करिन ,मला समाजिक कार्य करायला आवडेल, कलाकारांना न्याय देण्याचे प्रत्न करिन. या निवडी विषय लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य चे सर्व सदस्य व पदाधिकारी यांनी पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# धारूरच्या शिवसैनिकाला अखेर न्याय!

## बाबासाहेब सराफ यांच्याकडे (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रभारी तालुकाप्रमुख पदाचा पदभार

धारूर/ प्रतिनिधी

धारूर शहरातील कट्टर शिवसैनिक म्हणून प्रसिद्ध असणारे , शहरप्रमुख पदावर देखिल कार्यरत असणारे बाबासाहेब सराफ यांना प्रभारी तालुकाप्रमुख पदी निवड करण्यात आली या निवडीमुळे धारूरच्या शिवसैनिकाला अखेर न्याय दिल्याचे शिवसैनिक, पदाधिकारी, नागरिकांकडून बोलले जात आहे.शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शहरप्रमुख बाबासाहेब सराफ यांच्या कडे किल्ले धारूर तालुक्याचा प्रभारी



तालुकाप्रमुख पदाचा पदभार देण्यात आला आहे.हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने शिवसेना पक्षप्रमुख तथा मा. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या आदेशाने व शिवसेना नेते आ.सुनिल प्रभु व संपर्क प्रमुख किशोर पोतदार यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विनायक ढगे यांच्या उपस्थितीत बाबासाहेब सराफ यांची शिवसेना (धारुर) प्रभारी तालुका प्रमुख या पदावर नियुक्ती करण्यात आली.

जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी नियुक्ती पत्र देऊन शुभेच्छा दिल्या.त्याच्या या निवडी बद्दल शहरासह तालुक्यात आनंद उत्साह साजरा केला जात आहे.बाबासाहेब सराफ यांची शिवसेना उबाठा गट प्रभारी तालुकाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अपक्ष उमेदवार शितल धोंडरे यांच्यामुळे प्रस्थापितांचे टेंन्शन वाढणार?

बीड ।प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची तयारी करत असतांना प्रस्थापितांकडून राष्ट्रीय नेते यांच्या सभेची तयारी होत आहे म्हणजेच बीडची लोकसभा ही महायुती आणि महाविकास आघाडीसाठी किती प्रतिष्ठेची आहे हे दिसून येते तर बीड येथेच अपक्ष उमेदवारी अर्ज भरलेल्या शितल धोंडरे यांच्या कॉर्नर बैठकी व भेटीगाठी दरम्यान दिवसेंदिवस वाढणार्या प्रचंड गर्दीमुळे व भरघोस प्रतिसादामुळे प्रस्थापितांचे टेंन्शन वाढणार असल्याचे पहायला मिळत आहे.

शितल धोंडरे यांनी सामाजिक कार्य करत असतांना महिला अन्यायाविरोधात वाचा फोडली, समाजाची जबाबदारी म्हणून मराठा आरक्षणासाठी आंदोलन केले तसेच विद्यार्थ्यांना मदत करत असतांना प्रवेश मिळवून दिले विद्यार्थीनीच्या देखील अडी-अडचणी दुर केल्या तसेच कोरोना काळात अन्नधान्याचे वाटप करुन जनसेवेचे व्रत हाती घेतले.तसेच यापुर्वी देखील शेतकर्यांच्या प्रश्नांसाठी, रस्त्यांचे काम




दर्जेदार व्हावे यासाठी शासन दरबारी लढा दिला. तसेच शितल धोंडरे यांचा जनसामान्यांत मोठा संपर्क असून त्या जात-पात न पाहता कोणत्याही व्यक्तीच्या मदतीला धावून येतात अशा त्यांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांनी घेतलेल्या कॉर्नर बैठकीमध्ये त्यांना बीड, गेवराईतील गढीफाटा, जातेगाव, सिरसदेवी, पाडळसिंगी तसेच माजलगाव येथून चांगला प्रतिसाद मिळत असून मतदारांना देखील आता बदल हवा आहे असेच चित्र निर्माण झाले आहे.

शितल धोंडरे यांच्यासाठी त्यांचे सहकारी केदार काटे, धनंजय धोंडरे, कृष्णा धोंडरे, शिवाजी धोंडरे, यादव चैतन्य, आयेशा बागवान ,अशोक चव्हाण, रामेश्वर कोरडे यांच्यासह केज तालुक्यातमध्ये देखील शितल धोंडरे यांचा शालेय जिवनापासून चांगला संपर्क असल्यामुळे ज्ञानेश्वर थोरात यांची टीम कामाला लागली असून शितल धोंडरे यांच्यामुळे प्रस्थापितांचे टेंन्शन वाढणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# मुलींची शारीरीक क्षमता सुदृढ असावी-डॉ.शुभदा लोहिया

## महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचे उदघाटन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महिला,मुलींच्या शारीरिक मानसिक बौद्धिक क्षमता पूर्णपणे सुदृढ असावी असे मत येथील प्रसिद्ध शल्यविशारद तथा सामाजिक कार्यकर्त्या डॉ.शुभदा लोहिया यांनी व्यक्त केले .येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी,श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास व स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या वतीने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.अध्यक्षस्थानी यो. शि.संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापुरकर होते. तर व्यासपीठावर यो.शि.संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, उपाध्यक्ष जी.बी.व्यास, राष्ट्रीय हॉकी खेळाडु




श्रेया पवार, शिबीर प्रमुख भीमाशंकर शेटे , प्रा.एम.एस.लोमटे,ड. कल्याणी विर्धे ,डॉ. जयश्री देशपांडे,आर. व्ही.सोनवळकर ,सय्यद पाशू करीम,प्राचार्य पी.आर.थारकर, समन्वयक प्रा.प्रविण भोसले आदी उपस्थित होते.पुढे डॉ.लोहिया म्हणाल्या की आठवी ते बारावी पर्यंतचा काळ मुलींसाठी अत्यंत महत्वाचा असतो या काळात शारीरीक क्षमता सुदृढ ठेवली पाहीजे कारण याच वयात बौद्धिक क्षमतेचा विकास होतो

अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापुरकर म्हणाले की, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष सर्वांचे मार्गदर्शक डॉ.सुरेश खुरसाळे यांच्या प्रेरणेतून मागील चौदा वर्षांपासून हे आत्मभान शिबिर आयोजित केले जात असून मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी अशा शिबिराची आवश्यकता आहे केवळ अभ्यासाला महत्त्व न देता खेळांना देखील प्रोत्साहन दिले पाहिजे, मी कांहीं करु शकते हे अशा शिबिरातून मुलींना समजले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी श्रेया पवार, जी.बी.व्यास यांनी मनोगत व्यक्त केले प्राचार्य डॉ.पी.आर.थारकर यांनी प्रास्ताविक व समन्वयक प्रा.प्रविण भोसले यांनी शिबिर घेण्या बाबतचा उद्देश सांगितला. संचालन प्रा.डॉ.संपदा कुलकर्णी व वैष्णवी वाघमारे, तेजस्विनी होळंबे यांनी तर आभार डॉ.शैलजा बरुरे यांनी मानले.यावेळी प्रशिक्षक प्राध्यापक,शिक्षक, कर्मचारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे कडब्याची गंज जळाली

## टेकवुन दिल्याचा संशय; महसूल व पोलीस प्रशासनाची घटनास्थळी भेट

लिंबागणेश (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बांधकाम मिस्त्री सय्यद अयुब सय्यद अली यांच्या घराशेजारील ज्वारीच्या कडब्याची गंज मध्यरात्री जळाली.जवळपास लाईटची तार नसल्याने अज्ञाताने गंज पेटवून दिल्याचा संशय व्यक्त केला असुन यात त्यांचे अंदाजे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले असुन मंडळ अधिकारी अशोक डरपे, तलाठी गणपत पोतदार यांनी घटनास्थळी पाहणी करत स्थळपंचनामा केला असुन तहसिल प्रशासनाला कळवले आहे.नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,लिंबागणेश पोलिस चौकीचे बाबासाहेब डोंगरे यांनी घटनास्थळी भेट देत तपासणी केली. दुष्काळाच्या दिवसात जनाव-यांच्या चा-याचा प्रश्न गंभीर निर्माण झालेला असताना याप्रकारच्या घटनेमुळे ग्रामस्थांनी हळहळ व्यक्त केली.

आज दि.०३ शुक्रवार रोजी मध्यरात्री सय्यद अयुब सय्यद अली यांच्या घराच्या पाठीमागील भिंती लगत पत्र्याच्या शेडमध्ये बांधलेल्या म्हशीच्या हंबरण्याने जाग आली असता त्यांनी घराच्या बाहेर येऊन पाहणी केली असता मोठा जाळ दिसला. त्यांची कडब्याची गंज पेटलेल्या अवस्थेत होती. पत्नी,मुलांनी पाणी टाकून आग विझवण्याचा प्रयत्न केला परंतु आग विझली नाही.आगीत जवळपास १००० कडबा जळुन खाक झाला असुन त्याशेजारी असणा-या बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या लाकडी फळ्यांनी पेट घेतला.एकंदरीत ३० हजारांच्या जवळपास नुकसान झाले आहे.



# पंकजाताई ला मोठ्या मताधिक्याने संसदेत पाठवा-प्रा. गांडगे संदिप

प्रतिनिधी (बीड)

आपल्या जिल्हा मध्ये लोकसभेच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे आणि जिल्ह्याच्या विकासासाठी ताईंनी आतापर्यंत कोठीवर निधी सत्तेच्या काळात जिल्हयाला दिला. त्याच सत्तेच्या काळात ताईंच्या शेतकऱ्यांना आतापर्यंत इतिहास सर्वात जास्त मदत त्यांच्या काळात मिळून दिली. ताईंनी ज्या ज्या खात्याच्या मंत्री



राहिल्या त्या पदावरून आपल्या जिल्ह्याची जास्तीत जास्त सेवा केली. म्हणून या निवडणुकीत भविष्यात आपल्या जिल्ह्याचा विकास करण्यासाठी ताईंना संसदेत पाठवणे आपल्याला गरजेचे आहे. म्हणून आपण कुठल्याही भूलथापांना बळी न पडता आपण ताईंच्या पाठीशी मतदानरूपी उभं रहावं. असं आव्हान प्रा. संदिप गांडगे यांनी माध्यमांशी केले..!


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT